| MHRG080009022021 | **रे.दि.मु.क्र.** ४८/२०२१<br>श्रीमती कुंदाबाई मधुकर महाब्दी<br>**वि.**<br>जनार्दन साधु गायकवाड तर्फे<br>श्री. बाळु जनार्दन गायकवाड व इतर |
|---|---|

## निशाणी ५३ वर आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे **दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश १ नियम १० कलम १५१** प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :—

दाव्यामध्ये मिळकत केलेल्या मिळकती वादीच्या वडीलोपार्जित मालकीच्या मिळकती आहेत. त्या मिळकतींमध्ये वादीचा अविभाज्य कायदेशीर हिस्सा आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. ९ महाव्यवस्थापक (भुमी व सर्वेक्षण) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या विरुध्द देखील दावा दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी यांनी मुख्य नियोजनकार विशेष नियोजन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडे वादीची जमिन मिळकत मुंबई पुणे द्रुतगती महामार्गालगत गेलेल्या जमिनीच्या चौकशीचे आदेश सुरु केल्याने वादींना प्रतिवादी क्र. ९ चे विरुध्द महाराष्ट्र सरकार यांच्याकडे अर्ज करुन दाद मागण्याची आहे. त्याचे नाव अनावधानाने दाखल झाले आहे. सर्व शेतकरी बांधवांनी एकत्रित येवून न्याय मागण्याचा विचार केल्याने प्रस्तुत प्रतिवादीचे नाव दाव्यातून काढून घेण्यासाठी अर्ज दिलेला आहे. सदर प्रतिवादीचे नाव कमी केल्यास दाव्यावर काहीही परीणाम होणार नाही.

३. प्रतिवादीतर्फे निशाणी ५५ वर म्हणणे दाखल केलेले आहे. सदर म्हणण्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. प्रस्तुत दावा सन २०२१ मध्ये दाखल केलेला असून सदर अर्ज २०२५ मध्ये दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादीने निशाणी ४१ वर अर्ज देवून आदेश ७ नियम ११ प्रमाणे

प्रतिवादी क्र. ९ विरुध्द दावा चालवण्याचा अधिकार प्रस्तुत न्यायालयास नाही असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. वादीने प्रतिवादी क्र. ९ ला अनिर्वाय असणारी नोटीस देखील दिलेली नाही. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज निशाणी ४१ दाखल केल्यानंतर दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने दाव्यातील कथनांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी तर्फे दाखल करण्यात आलेल्या दावा मिळकतीच्या ७ X १२ उता—यांचे अवलोकन केले असता सर्वे नंबर ७२/१०, ७२/१२ यावर प्रतिवादी क्र. ९ यांचे नाव नमूद आहे. दाव्यातील कथनाप्रमाणे नमूद दावा मिळकती या वडीलोपार्जित असून त्यामध्ये वादीने वाटप मागितलेले आहे. अशा परिस्थितीत दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश १ नियम १० मधील तरतूदींचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्यामध्ये वादी पक्षकार वाढवू शकतो किंवा कमी करु शकतो. परंतु प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असून त्यामध्ये वर नमूद केलेल्या दावा मिळकतींवर प्रतिवादी क्र. ९ चे नाव नमूद आहे. तसेच वादी तर्फे केवळ पक्षकार म्हणून प्रतिवादी क्र. ९ ला काढून टाकण्याची विनंती केलेली आहे व सर्व शेतकरी बांधव त्याकरीता स्वतंत्र अर्ज देणार आहेत असे नमूद केलेले आहे. परंतु दाव्यातील सदर मिळकतीच्या अनुषंगाने कोणतीही दुरुस्ती करुन मागितलेली नाही.

६. प्रस्तुतचा दावा सन २०२१ मध्ये दाखल झाल्यानंतर ४ वर्षांनंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज प्रतिवादींतर्फे दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल केल्यानंतर दाखल करण्यात आला. यावरुन असे दिसून येते की, दाव्यातील कमतरता भरुन काढण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु प्रतिवादी क्र. ९ या दाव्यामध्ये

आवश्यक पक्षकार आहेत. त्यांच्याशी संबंधीत मिळकती या दाव्यामध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ९ यांना दाव्यातून कमी केल्यास दावा गुणदोषावर अंतिमरीत्या निर्णयीत होणार नाही. त्यामुळे वादीस केवळ प्रतिवादी क्र. ९ चे दाव्यातील नाव वगळून त्या संदर्भात असणा—या मिळकती दाव्याचा विषय ठेवून व त्याबाबतचे कथने दाव्यात ठेवून प्रतिवादी क्र. ९ ला दाव्यातून वगळता येणार नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज निशाणी ५३ नामंजूर करणेत येतो.

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2025.11.28 17:38:17 +0530

दिनांक :— २८/११/२०२५.
स्थळ :— खालापुर.

**( श्रीमती एस.एस.देशमुख )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खालापुर.

## Certificate

I affirm that, the contents of the P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Smt. S. S. Deshmukh<br>CJJD & JMFC, Khalapur |
| Name of Steno | : | Shri. Rakesh S. Patil<br>Stenographer, Grade – III |
| Date of Order | : | 28/11/2025 |
| Order signed by P. O. On | : | 28/11/2025 |
| Date of PDF & Order uploaded on | : | 28/11/2025 |